ठळक बातम्या

- ईशान्य भारतात सुरक्षा दल आणि स्थानिक नागरिकांमधलं विश्वासाचं नातं दृढ झाल्यामुळे विकासाला चालना मिळाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन

- राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचं निधन

- गुजरात आणि राजस्थानात झालेल्या अपघातांमध्ये एकूण १६ जणांचा मृत्यू, ७ जण जखमी

आणि

- न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव ७२० धावांवर घोषित

<><><><><>

केंद्र सरकारनं राबवलेल्या विविध उपक्रमांमुळे सुरक्षा दल आणि स्थानिक नागरिक यांच्यातलं विश्वासाचं आणि सहकार्याचं नातं अधिक दृढ होत असून देशाच्या ईशान्येकडच्या भागाच्या विकासावर सरकारनं भर दिल्याचं केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी सांगितलं. अरुणाचल प्रदेशमधल्या डोर्जी खांडू इथल्या सहकार परिषदेत 'अरुणाचल प्रदेश सहकार व्हिजन डॉक्युमेंट २०४७ या एका विशेष पुस्तकाचं आज अनावरण केल्यानंतर ते बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आमच्या सरकारनं या भागातल्या शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराला प्राधान्य दिलं दिल्याचं सांगून या भागाच्या विकासाकरता आमच्या सरकारनं सत्तेवर आल्यापासून निधीत तिप्पटीनं वाढ केल्याचं ते म्हणाले.

होल्ड.. बाईट- अमित शाह

त्यांच्या दिवसांच्या दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी ते NDRF, अर्थात, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या संकुलाचं उद्घाटनही करणार आहेत.

<><><><><>

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५७व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा ब्रिक्स सदस्य देशांचे सिनेमे दाखवले जात आहेत. ब्रिक्स समूहाचं अध्यक्षपद भारताकडे असल्यामुळे हे विशेष चित्रपट प्रदर्शन आयोजित केलं आहे. रामायण - राईज ऑफ ए लिजंड भाग १ या चित्रपटानं ब्रिक्स विभागाच्या प्रदर्शनाची सुरुवात होईल. आर्टिकल 370 हा सिनेमासुद्धा दाखविला जाणार आहे. या विभागात ब्रिक्स च्या सदस्य आणि भागीदार देशांचे एकूण २१ चित्रपट प्रदर्शित होणार आहेत.

महोत्सवादरम्यान ब्रिक्स सदस्य देशांची परिषदही झाली. या देशांमधल्या चित्रपट निर्मितीच्या संधींचा शोध घेणे हा परिषदेचा मुख्य उद्देश होता. 'सीमापार कथा' या यंदाच्या इफ्फीच्या संकल्पनेत ब्रिक्स देशांमधल्या लोकांमध्ये दीर्घकालीन संबंध निर्माण करण्याची ताकद असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव 'श्री प्रभात' यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

बल्गेरियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. वेलिस्लावा पेट्रोव्हा - चामोव्हा या तीन दिवसांच्या भारत भेटीनंतर आज मायदेशी परतल्या. नवी दिल्लीत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी डॉ. वेलिस्लावा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी दोन्ही देशांच्या परस्पर संबंधांच्या विविध पैलूंचा आढावा घेण्यात आला. व्यापार आणि गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ, संरक्षण, शिक्षण, संस्कृती, दळणवळण आणि परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील संबंध अधिक दृढ होत असल्याबद्दल मंत्र्यांनी समाधान व्यक्त

केलं. प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर तसंच बहुपक्षीय व्यासपीठांवरील सहकार्याबाबतही यावेळी दोघांमध्ये चर्चा झाली.

<><><><><>

राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचं आज पहाटे हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ७२ वर्षांचे होते. राजस्थानात एका धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर पोटदुखीच्या तक्रारीवरुन त्यांना नवी दिल्लीत एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. महाराष्ट्रातल्या हिंगोली जिल्ह्यातल्या बाभूळगावचे रहिवासी असलेले वडकुते यांचा जन्म १९५४ मध्ये वाशीम जिल्ह्यात वारला इथे झाला. बीएस्सी पदवी घेतल्यानंतर त्यांनी काही काळ वीज वितरण कंपनीत नोकरी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून राजकीय कारकीर्द सुरू करताना त्यांनी २००१ ते २००४ आणि २०१२ ते २०१४ या काळात शेळी-मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्षपद भूषवलं. २०१४ मध्ये त्यांची विधान परिषदेवर निवड झाली. त्यानंतर २०१९ मध्ये भाजपात प्रवेश करून त्यांनी राज्यभर पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी काम केलं. एप्रिल २०२६ मध्ये भाजपाने त्यांना राज्यसभेवर संधी दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही वडकुते यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामराव वडकुते यांना आदरांजली वाहिली आहे. त्यांच्या निधनामुळे एक सालस आणि साधं व्यक्तिमत्व राजकारणातून हरपल्याचं त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

मध्यप्रदेशात बालाघाट जिल्ह्यात अन्नामधून झालेल्या विषबाधेमुळे काल १०० पेक्षा जास्त लहान मुलं आणि इतर १२ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. 'हिरी' या गावातल्या जत्रेत काल रात्री ही घटना घडल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. रुग्णांची प्रकृती स्थिर असून काही जणांना उपचारानंतर घरी सोडल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राजस्थानमध्ये कोटा-उदयपूर राष्ट्रीय महामार्गावर आज पहाटे एका प्रवासी गाडीने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडक देऊन झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले. अपघातग्रस्त वाहनातले प्रवासी महाराष्ट्रातल्या धुळे जिल्ह्याचे रहिवासी होते. राजस्थानातल्या सीकर जिल्ह्यातल्या 'खाटू श्यामजी' मंदिराला भेट देऊन ते घरी परतत होते. जखमींवर कोटा इथल्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

गुजरातमध्ये कच्छ जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर काल रात्री एका ट्रकने कारला धडक देऊन झालेल्या आणखी एका अपघातात कारमधले सात प्रवासी मृत्युमुखी पडले. अपघातग्रस्त वाहनातले सर्व प्रवासी उत्तराखंडमधल्या गढवालचे रहिवासी असून, ते भुज इथं तैनात असलेल्या लष्करी जवानांचे कुटुंबीय होते. कच्छच्या रण भागाला भेट देऊन ते परतत होते, अशी माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दोन्ही अपघातांमध्ये झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांच्या जवळच्या नातेवाईकाला प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीमधून दोन लाख रुपयांची, तर जखमींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलँड यांच्यात वेलिंग्टन इथं सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं पहिला डाव ९ बाद ७२० धावांवर घोषित केला आणि ३५२ धावांची भक्कम आघाडी घेतली. या धावसंख्येसह भारतानं कसोटी क्रिकेटमधल्या अनेक विक्रमांना गवसणी घातली. भारताची कसोटी क्रिकेटमधली ही परदेशातली सर्वोच्च धावसंख्या ठरली. तसंच आघाडीचे पाचही फलंदाज एका डावात ८० पेक्षा जास्त धावा करणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. भारताकडून के एल राहुलनं १३६, ऋषभ पंतनं १२८ तर शुभमन गिलनं ९८ धावा केल्या. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा न्यूझीलँडच्या दुसऱ्या डावात २ बाद ११९ धावा झाल्या असून डेवोन कॉनवे ५९ तर रचिन रवींद्र २७ धावांवर खेळत होते.

<><><><><>

नेपाळमध्ये काठमांडू इथं सुरू असलेल्या चार देशांच्या कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या २० वर्षाखालच्या कबड्डी संघानं बांग्लादेशचा ७६ - २१ असा पराभव केला. स्पर्धेच्या गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानावर असून नेपाळ दुसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><>

भोपाळमध्ये महिला आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या दुसऱ्या साखळी सामन्यात काल भारताने दक्षिण कोरियाचा २-१ असा पराभव केला. भारताच्या नवनीत कौर ला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून घोषित करण्यात आलं. या स्पर्धेतला भारताचा हा सलग दुसरा विजय आहे. भारत आज थायलंडविरुद्ध आपला पुढचा सामना खेळणार आहे. त्यानंतर, २४ नोव्हेंबर रोजी चीनविरुद्ध आणि २५ नोव्हेंबर रोजी जपानविरुद्ध भारतीय संघ मैदानात उतरेल.

<><><><><><>

आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये आज वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता असून, उत्तरप्रदेशाच्या पूर्वेकडच्या भागात उद्यापर्यंत दाट धुक्याची स्थिती कायम राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, राजधानी दिल्ली परिसरात हवेची गुणवत्ता 'वाईट' श्रेणीत असून, आज सकाळी ७ वाजता दिल्लीत हवेचा गुणवत्ता निर्देशांक २३६ नोंदवला गेला.

//<><><><><><>//